ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यकालीन शिक्षक शिक्षण

**श्रीम. वाबळे अर्चना विलासराव**
गेनबा सोपानराव मोझे अध्यापक महाविद्यालय,वडमुखवाडी, पुणे – ०६

**Abstract**

*बदल हा निसर्गाचा नियम आहे. स्थितीशील असे काहीच नाही. आज सर्वच क्षेत्रात झपाटयाने बदल होत आहे. जागतिकीकरणा स्पर्धेच्या युगात जर आपणास टिकायचे असेल तर आपले सर्वच्या शैक्षणिक उपक्रम आपणास आजच्याच दृष्टीने नव्हे तर भविष्यकाळात ही कसे उपयुक्त ठरतील याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण समाज परिवर्तनाचे प्रमुख साधनच शिक्षण आहे. वर्तमानाच्या खांद्यावर बसून भविष्याचा वेध घ्यावा लागेल. शैक्षणिक उपक्रम भविष्याभिमुख बनवावे लागतील. भविष्य हे घडत नसते तर आपणांस ते घडवावे लागते. शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या शिक्षणाचा भविष्यात डोकावून विचार करावा लागेल. त्यासाठी प्रशिक्षणार्थी केंद्रित शिक्षक शिक्षण द्यावे. गरजानुसार अभ्यासक्रम, निकोप आंतरक्रिया, उद्बोधन, वर्ग, सरावपाठांची गुणात्मकता वाढविली पाहिजे. नवीन कल्पनांचा स्विकार, सामाजिक संपर्क वाढविणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करुन नैतिक शिक्षणाची तरतूद करावी. शिक्षक शिक्षण कार्यक्रमात समानता आणून तणाव व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. नोकरी, व्यवसाय, मार्गदर्शनाची सोय करुन शिक्षक शिक्षण संस्थांची सुसज्जता वाढवावी. जीवनाभिमुख, संस्कृती सुसज्जता वाढवावी. जीवनाभिमुख, संस्कृती संवर्धन शिक्षण द्यावे. त्यासाठी महाविद्यालयांना स्वायत्ता देवून सामुदायिक जवीन उपक्रमांचे आयोजन करुन शालेय अनुभूती देणे व छात्र सेवाकालाची तरतूद करुन U.G.C., NCTE, NCERT, SCERT, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळात समन्वय साधावा. जेणे करुन उद्याच्या शिक्षक शिक्षणाची आखणी करता येईल व भविष्यातील जबाबदाऱ्या पेलणारे शिक्षक तयार करण्याचे सामर्थ शिक्षक शिक्षणात येईल हे प्रस्तुत संशोधनपर लेखात मांडलेले आहे.*

**Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com**

**प्रस्तावना :–**

जागतिकिकरणाच्या युगात शिक्षक शिक्षणाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. बदल हा निसर्गाचा नियम आहे. स्थितीशील असे काहीच नाही. आज सर्वच क्षेत्रात झपाटयाने बदल होत आहे. जागतिकिकरणाच्या स्पर्धेच्या युगात जर आपणास टिकायचे असेल तर आपले सर्व उपक्रम आपणास आजच्याच दृष्टीने नव्हे तर भविष्यकाळातही कसे उपयुक्त ठरतील याचा विचार करावा लागेल. वर्तमानाच्या खांद्यावर बसून भविष्याचा वेध घ्यावा लागेल. शैक्षणिक उपक्रम भविष्याभिमुख बनवावे लागतील. भविष्य हे घडत नसते तर आपणास ते घडवावे लागते.

शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या शिक्षणाचा भविष्यात डोकावून विचार करावा लागेल. म्हणून प्रथम शिक्षक शिक्षणाचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.

**शिक्षक शिक्षणाचा अर्थ –**

१) शिक्षक शिक्षण म्हणजे जी व्यक्ती शिक्षकीपेशात प्रवेश करु इच्छिते त्या शिक्षकी पेशात पारंगत होण्यासाठी योग्य ते व्यवसायिक शिक्षण देणे.

२) विविध स्तरांवर म्हणजे पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक स्तरांवर परिणामकारक अध्यापन कार्य करणे व सुयोग्य नागरिक घडविण्याचे कौशल्य ज्या शिक्षणाच्या माध्यमातून प्राप्त होते त्याला शिक्षक शिक्षण म्हणतात.

**शिक्षक शिक्षणाची उद्दिष्टे –**

१) शिक्षक प्रशिक्षणाची संकल्पना समजून घेणे.

२) शिक्षक प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या कौशल्याचा विकास करणे.

३) विविध स्तरातील शिक्षक प्रशिक्षणाच्या समस्या जाणून घेण्याची दृष्टि विकसित करणे.

४) शिक्षक प्रशिक्षणातील नवीन प्रवाह, नवीन, तंत्र पध्दती समजून घेणे.

५) शिक्षक शिक्षणात नवीन प्रवाह आणण्यासाठी प्रायोगिक वृत्तीचा विकास करणे.

शिक्षक शिक्षणाचा अर्थ व उद्दिष्टे लक्षात घेता ही उद्दिष्टे कितपत साध्य झाली आहेत हे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षक शिक्षणाच्या सद्यस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे.

**शिक्षक शिक्षण – सद्यस्थिती –**

शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकाच्या गुणवत्तेवर आधारित आहे. त्यामुळे एकूणच शिक्षण प्रक्रियेत शिक्षक आणि पर्यायाने शिक्षक – शिक्षणाचे अनन्य साधारण महत्व आहे. या शिक्षणाच्या गुणवत्ता विकासासाठी NCTE, UGC विद्यापीठ महाविद्यालये, संस्था स्वत: अध्यापक प्रयत्नशील असतात. तरी सुध्दा शिक्षक – शिक्षणात अनेक त्रुटी आढळून येतात. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. या समस्या NCTE, UGC व विद्यापीठे आपल्या परीने सोडविण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच आपल्याला शिक्षक शिक्षणाची सद्यस्थिती लक्षात घेणे महत्वाचे वाटते.

- **शिक्षक शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया –** यावर कायमस्वरुपी आक्षेप घेतला जातो की, बी.एड् प्रवेशाची गुणवत्ता कमी असते. उच्च गुणवत्तेच विद्यार्थी अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्राकडे जातात.
- **विद्यार्थी संख्या** :– १०० विद्यार्थ्यांना पूर्णत: शासकीय यादी वा व्यवस्थापकिय गुणवत्ता यादीनुसार प्रवेश दिला जातो.
- **विद्यापीठ निहाय प्रवेश** :– ज्या राज्यात बी.एड्. करावयाचे त्या राज्यातील ७०% प्रवेश भिन्न विद्यापीठातील २८% व अन्य राज्यातील २% प्रवेश दिला जातो.
- **प्रवेश पात्रता** :– पदवीधर, गुण ५% राखीव ४५% इतर मागासवर्गीय तसेच CET साठी खुला वर्ग व राखीव जागांसाठी १५ व १८ गुणांची आवश्यकता.
- **शिक्षक शिक्षणाचा उपलब्ध कालावधी :–** शिक्षकी पेशासाठी/व्यवसायासाठी आवश्यक कला कौशल्यांच्या विकासासाठीचा हा कालावधी अपुरा पडतो.
- **प्रात्यक्षिक कार्यातील अडचणी :–** बी.एड्. मधील महत्वाचे प्रात्यक्षिक म्हणजे सरावपाठ, छात्रसेवाकाल यासाठी महाविद्यालये पूर्णत: शाळांवर अवलंबून असतात अपूऱ्या व योग्य वैचारिक देवाणघेवाण अभावी शाळा संपूर्ण सहकार्य करण्यास असमर्थ ठरतात. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात.
- **विषयज्ञानातील त्रुटी :–** यामुळे पाठात यांत्रिकता येते. विद्यार्थी लक्ष देत नाही. त्यामुळे सरावपाठ दर्जेदार होत नाही.
- **भाषण कौशल्याचा अभाव :–** यामुळे पाठ घेताना आशय दर्जेदारपणे विद्यार्थ्यांसमोर मांडण्यास आमचे विद्यार्थी कमी पडतात.
- **सराव पाठासंबंधी समस्या :–** बी. एड्. अभ्यासक्रमाचा सरावपाठ 'आत्मा' असे संबोधले जाते. मात्र सराव पाठांना शाळा उपलब्ध करुन देण्यास सकारात्मक भावनेचा अभाव दिसतो. प्रशिक्षित छात्र

अध्यापकांचा आत्मविश्वास व अध्यापन पध्दती – विषयीची साशंकता दिसते. वेळापत्रकात अचानक बदल होणे. अचानक सुट्टी अशा अनेक समस्या सद्यस्थितीत दिसून येतात.

- **पाठांचे निरीक्षण :–** निरीक्षकास कोणत्याही विषयाचा पाठ निरीक्षण करावा लागतो. त्यामुळे ज्या सूचना दिल्या जातात त्या रचनात्मक वा वर्णनात्मक असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या उणिवा व बलस्थाने समजत नाही.
- **जुना अभ्यासक्रम :–** आजचे ज्ञान उद्या शिळे ठरते. मग वर्षानुवर्ष शिक्षक शिक्षणाचा चालणारा अभ्यासक्रम काळानुरुप होणे गरजेचे असते. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासक्रम उपयुक्त ठरेलच असे नाही.
- **संदर्भ पुस्तकांचा अभाव :–** काळानुरुप नवीन आणि अभ्यासक्रमानुरुप पुस्तकांचा तुटवडा मोठया प्रमाणात जाणवतो.
- **अध्यापन पध्दती विषयक सद्यस्थिती :–** वाणिज्य संरक्षणशास्त्र संगणक शाखेच्या प्रशिक्षणार्थींना दिल्या जाणाऱ्या अध्यापन पध्दती मुळे अडचणी निर्माण होतात.
- **विनाअनुदानित महाविद्यालयांची निर्मिती :–** ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. कारण पात्रता व गुणवत्ता या दोन्ही समस्या यामुळे निर्माण झाल्या. अशा महाविद्यालयांना मान्यता मिळाली. परंतू आवश्यक भौतिक सोयी सुविधा पुरवण्यात ती अयशस्वी ठरली.
- **पात्र प्राचार्याच्या नेमणूकीचा प्रश्न :–** बहूतांशी प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त व्यक्तीची नेमणूक करण्यात आली. त्यामुळे काम व वेतन यात तफावत निर्माण झाली.
- **अध्यापक नेमणूकीची सद्यस्थिती :–** पात्र अध्यापकांची कमतरता व पात्रता असताना कमी वेतन का घ्यावे? अशी द्विधा मन:स्थिती अध्यापकांची निर्माण झाली. परिणामत: पात्रता धारकांअभावी उपलब्ध अध्यापकांच्या नेमणूकीला पर्याय उरला नाही.
- **अध्यापकांच्या सेवेचा प्रश्न :–** बी.एड्. होणाऱ्या विद्यार्थ्यीचे प्रमाणे वाढले मात्र सर्वांना नोकरी नाही. त्यामुळे बेरोजगाराची समस्या निर्माण झाली. त्यामुळे विनाअनुदानित शाळांमध्ये कमी वेतनावर काम करणे. इ कारणांमुळे शिक्षक–शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलल्यास आश्चर्य वाटू नये.

शिक्षण – शिक्षणातील सद्यस्थिती लक्षात घेता शिक्षकांना शिक्षण देणाचा शिक्षणाचा भविष्यात डोकावून विचार करावा लागेल. गतिमान समाज स्थिर शिक्षण पध्दती सहन करणार नाही. तसेच गतिमान शिक्षण पध्दती स्थिर अध्यापक शिक्षण खपवून घेणार नाही. म्हणून याबाबत केवळ आजचाच नव्हे तर उद्याचा विचार करणे अधिक गरजेचे आहे. Charles F. Kettering म्हणतात "I am not – interested in the past, I am interested only in the future for there is where I expect to spend the rest of my Life" म्हणून उद्याची दृष्टी असणे अधिक महत्वाचे आहे. राष्ट्राचा दर्जा शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो म्हणजेच शिक्षक – शिक्षण कार्यक्रमांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. कोठारी आयोगाच्या अहवालात म्हटले आहे की, "The destiny the nation is being shaped in her classes" म्हणून उपक्रम आखताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.

**१)प्रशिक्षणार्थी केंद्रित शिक्षक शिक्षण –** सध्याची शिक्षण पध्दती विद्यार्थी केंद्रित आहे. तव्दत शिक्षक शिक्षणाचे कार्यक्रमही प्रशिक्षणार्थी केंद्रित असले पाहिजेत. त्यासाठी स्वयं अध्ययन, सर्वेक्षण, क्षेत्रिय काम प्रात्यक्षिके व प्रात्याक्षिकांमध्ये वैकल्पिकता ठेवल्याने प्रशिक्षणार्थी आपल्या आवडी अभिरुचीनुसार प्रात्यक्षिकाची निवड करुन ते पूर्ण करतील.

**२)काळानुरुप अभ्यासक्रमाची रचना –** आजचे युग हे शैक्षणिक तंत्रविज्ञान, माहिती तंत्रविज्ञान, संगणक, इंटरनेट यांचे आहे. तेव्हा अशा विषयांचा व प्रात्यक्षिकांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश केला पाहिजे. यासाठी प्रशिक्षणार्थीना संगणक वापराविषयीचे ज्ञान दिले पाहिजे. त्याची तरतूद अभ्यासक्रमात असली पाहिजे.

**३)निकोप आंतरक्रिया वृध्दींगत करणे –** निरनिराळया संस्थांशी शिक्षक शिक्षण संस्थांनी संबंध प्रस्तापित करुन चर्चा केल्याने आलेल्या अडचणींवर अध्यापकाचार्य विद्यार्थी एकत्र येवून उपाय शोधतील. जागतिक

स्तरावर शिक्षक शिक्षणा संबंधीच्या कार्यक्रमांची आखणी करुन सुयोग्य मानवी संबंध प्रस्तापित करुन Learning Webs, Learning to be ही युनेस्कोची संकल्पना प्रत्यक्षात येईल.

**४)उद्‌बोधन वर्गाचे आयोजन –** विद्यापीठीय शिक्षण विभागाचे शिक्षण प्रमुख, शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक यांनी शिक्षक – शिक्षणात जी नवप्रवर्तने येतात ती योग्य प्रकारे राबविण्यासाठी वेळोवेळी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करावे. तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार प्रात्यक्षिके दाखविली जावीत.

**५)सराव पाठांची गुणात्मकता वाढविणे –** सरावपाठ हा शिक्षक शिक्षण कार्यक्रमांचा आत्मा आहे. त्याची गुणात्मकता वाढविण्यासाठी सूक्ष्म अध्यापन व विविध विषयांमधील आदर्श पाठांचे व्हिडिओ शुटिंग करुन विद्यार्थ्यांना दाखविले पाहिजेत. पाठांचे योग्य मूल्यमापन करुन प्रत्याभरण केले पाहिजे. त्यामुळे सरावपाठांची गुणात्मकता वाढविता येईल.

**६) नवीन कल्पनांचा स्वीकार –** शिक्षक शिक्षणाचे कार्यक्रम गतिशील करण्यासाठी नवीन कल्पनांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय आयोगाच्या अहवालात सांगितले शिक्षणाचे चार स्तंभ (Learning to know, Learning to do, Learning to live together, Learning to be) विषय शिक्षण यासारख्या लाभदायक कल्पनांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

**७)उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचा विचार –** उदारीकरण व खाजगीकरणांमुळे शिक्षक प्रशिक्षण संस्थांची संख्या वाढली व गुणवत्ता ढासळली. मात्र जागतिकीकरणाचा विचार करता शिक्षक शिक्षणात गुणवत्ता राहिल असे उपक्रम आखण्याची गरज निर्माण झाली.

**८)शिक्षक शिक्षण कार्यक्रमात समानता –** विद्यापीठांना स्वायत्तता दिलेली आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यापीठाचा शिक्षक शिक्षण अभ्यासक्रम वेगळा राहणारच पण त्यात फार तफावत असू नये. निरनिराळया विद्यापीठातील अभ्यासक्रम पेपर्सची संख्या, गुण मूल्यामापन पध्दती इत्यादीत समानता असणे आवश्यक आहे.

**९)काळानूरुप योग्य पध्दतीचा, तंत्राचा वापर –** पारंपारिक पध्दत कमी करुन इतर अध्यापन पध्दतींचा वापर केला पाहिजे. उदा. – परिसंवाद, शोधन, पथकचर्चा, समूह अध्यापन, ICT इ. नवीन मूल्यमापन तंत्रांचा वापर केला पाहिजे. उदा. – श्रेणी पध्दती, सतत व सर्वकष मूल्यमापन

**१०)सामाजिक संपर्क वाढविणाऱ्या उपक्रमांचे आयोजन –** समाजात सामाजिक जाणिवा निर्माण करुन सामाजिक विकास साधण्यासाठी व्याख्याने, शिबीरे, प्रदर्शने, सहविचार सभा, प्रौढ शिक्षण कुटुंब सर्वेक्षण इ. उपक्रमाद्वारे सामाजिक संपर्क साधणे आवश्यक आहे.

**११) नैतिक शिक्षणाची तरतूद –** समाजातील दृष्कृत्ये नष्ट करण्यासाठी मानवी मूल्यांचे संस्कार हा उपक्रम राबविणे आवश्यक आहे. शिक्षक शिक्षणात नैतिक शिक्षणाची तरतूद असली पाहिजे. जेणे करुन सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न शिक्षक घडेल व देशाची नैतिक उंची वाढेल.

**१२) तणाव व्यवस्थापन –** आजचा युवक ताणतणाव, वैफल्य यातून जात आहे. त्यामुळे त्यांच्या शक्तीचा योग्य वापर न केल्याने गुन्हेगारी वाढली म्हणून विद्यार्थी ताण तणावमुक्त करण्यासाठी त्यांच्या समस्या जाणून घेवून त्यांना समुपदेशन करण्याची गरज आहे.

**१३) नोकरी, व्यवसाय मार्गदर्शनाची सोय –** यामुळे शिक्षण व नोकरी हे समीकरण बनले आहे. नोकरीच्या संधी कोठे उपलब्ध आहेत याचे मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. उदा. – व्यक्तिमत्व विकास केंद्र.

**१४) शिक्षक शिक्षक संस्थांची सुसज्जत –** भौतिक, आर्थिक, मानवी या सर्व दृष्टींनी शिक्षक सुसज्ज असला पाहिजे. उदा. – सुसज्ज इमारत, प्रयोगशाळा, ग्रंथालय, आर्थिकसुबत्ता इ. सर्व गोष्टी असतील तर शिक्षक शिक्षणात गुणवत्ता आणता येईल.

**१५)जीवनाभिमुखता –** जीवनापासून फारकत झालेले शिक्षण शिक्षणच नव्हे म्हणून शिक्षक शिक्षणाचे कार्यक्रम आखताना ते जीवनाभिमुख कसे होतील याचा विचार झाला पाहिजे. उदा – आज योग्यशिक्षण,

अजीवन शिक्षण, जीवन जगण्याचे कौशल्य, रेशमीकिडयांची पैदास, शैक्षणिक साधन निर्मिती इ. अभ्यासक्रमात ठेवणे.

**१६) संस्कृती संवर्धन व मूल्यमापन –** ज्ञान, कला, कौशल्य, चालिरिती यांचे जतन व संक्रमण डोळसपणे करावे लागते. जुने ते सोने व नवे ते हवे हे तत्व सोडून सद्यपरिस्थितीत जे उपयोगी आहे. त्याचा स्वीकार करावा. त्यासाठी संस्थांमध्ये सतत प्रयोग संशोधन विस्तार कार्य चालले पाहिजे.

**१७)स्वतंत्र विद्यापीठांची स्थापना –** यामुळे शैक्षणिक दर्जा उंचावेल. म्हणजेच लाखो लोकांच्या शिक्षणात होणारी सुधारणा लक्षात घेतली तर शिक्षक प्रशिक्षणात केलेली गुंतवणूक किफायतशीर ठरु शकेल.

**१८) शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना स्वायत्ता देणे –** सुसज्ज व गुणवत्तावर्धक महाविद्यालयांना स्वायतत्ता मिळाली पाहिजे. कारण – वेगळा अभ्यासक्रम सतत प्रयोग, संशोधन कार्य हाती घेतले जाईल व शैक्षणिक दर्जा उंचावेल.

**१९) सामुदायिक जीवन उपक्रमांचे आयोजन –** समायोजन साधण्यासाठी व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी पुढील उपक्रम आवश्यक आहेत. उदा – सहकारी भंडार चालविणे, सहली काढणे, अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रम राबविणे.

**२०) शालेय अनुभूती कार्यक्रम –** शिक्षक तयार करण्यातील शैक्षणिक अनुभव कार्यक्रम हा महत्वाचा भाग आहे. केवळ पाठ संपविण्यावर भर न देता या कार्यक्रमाची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन करावे.

**२१) छात्रसेवाकाळ तरतूद –** छात्र सेवाकाल हा व्यावसायिक तयारीचा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे. या काळात उत्तम अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अध्यापन सराव केला जातो. उदा. – अध्यापन, निरीक्षण, नियोजन, गृहपाठ तपासणी इ. अनुभव येतो. या काळात प्रशिक्षणार्थींनी विद्यावेतन द्यावे.

**२२) समन्वय –** आदर्श शिक्षक निर्मितीसाठी शिक्षक प्रशिक्षकांसाठी विविध प्रशिक्षण वर्गाची योजना केली पाहिजे. म्हणून U.G.C., NCTE, NCERT, SCERT, पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या कार्यक्रमांमध्ये समन्वय असावा.

अशा प्रकारे वरील सर्व बाबींचा विचार करुन उद्याच्या शिक्षक शिक्षणाची आखणी केली पाहिजे. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे २०२० ला भारत महासत्ता बनविण्याचे स्वप्न साकार करावयाचे असेल तर त्यासाठीचे सर्वात महत्वाचे माध्यम शिक्षण व ते शिक्षण देणारे शिक्षक तयार करणारे शिक्षक शिक्षण यामध्ये सुधारणा झाली पाहिजे.

**संदर्भ सूची –**

*डॉ. चव्हाण किशोर, डॉ. इसावे माधुरी, डॉ. चव्हाण शैला, प्रा. पाटील संदिप, प्रा. थिगळे राजेंद्र – ऑक्टोबर २०१० शिक्षक शिक्षण – प्रकाशन – इनसाईट पब्लिकेशन, नाशिक,*

*डॉ. मोरे चंद्रकांत, डॉ. भिलेगावकर सदानंद – संप्टेबर २००८ शिक्षक शिक्षण – नित्यनूतन प्रकाशन, पुणे*

*डॉ. पारसनीस म.रा. – ऑक्टोबर २००५ शिक्षकांचे प्रशिक्षण नित्यनूतन प्रकाशन, पुणे*